श्रीमती रितिका नरूला, (भारतीय आर्थिक सेवा) यांच्या संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या पदावरील प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती विहीत करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक- टीआरएन २०१९/प्र.क्र.६२/का-१२अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - २२ ऑगस्ट, २०१९

वाचा :- १) सामान्य प्रशासन विभाग, कार्यालयीन आदेश क्र.टीआरएन २०१९/प्र.क्र.६२/ १९/१२-अ, दि.११ जून, २०१९.

प्रस्तावना :-

श्रीमती रितिका नरुला, भारतीय आर्थिक सेवा (Indian Economic Services) यांची संदर्भीय आदेशान्वये संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार श्रीमती रितिका नरुला, भारतीय आर्थिक सेवा ह्या दिनांक १२.०६.२०१९(म.पू.) पासून संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या पदावर रुजू झाल्या आहेत. श्रीमती रितिका नरुला यांच्या संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या पदावरील प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती विहीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

श्रीमती रितिका नरुला, (भारतीय आर्थिक सेवा) यांच्या संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या पदावरील प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे विहीत करण्यात येत आहेत.

(१) प्रतिनियुक्तीचा कालावधी :-

श्रीमती रितिका नरुला, (भारतीय आर्थिक सेवा) ह्या दिनांक १२.०६.२०१९ पासून दि.२५.०५.२०२० पर्यंत वरील स्वीयेत्तर सेवेत प्रतिनियुक्तीवर असतील. मात्र,

अ) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनास आवश्यक वाटली तर त्यांचा स्वीयेत्तर सेवेचा कालावधी पूर्ण झाल्यावर किंवा पूर्ण होण्यापूर्वी केंद्र व राज्य शासनाच्या यासंदर्भातील नियमानुसार वाढविण्याचा हक्क शासनास असेल.

ब) त्यांच्या सेवेची आवश्यकता शासनास नसेल तर राज्य शासन त्यांना त्यांच्या मूळ सेवेत परत पाठविण्यास सक्षम असेल. मात्र ज्या दिनांकापासून तसे करावयाचे असेल त्याच्या कमीतकमी तीन महिने अगोदर तसे कळविणे आवश्यक राहील.

(२) **वेतन :-** श्रीमती रितिका नरुला (भारतीय आर्थिक सेवा) ह्या सदर प्रतिनियुक्तीच्या कालावधीत संचालक हे पद धारण करतील. सदर कालावधीत अंतिम वेतन प्रमाणपत्रानुसार (LPC) केंद्र शासनाच्या ७ व्या वेतन आयोगानुसार लेवल-१२ मधील मूळ (६ वा वेतन आयोग - पीबी-०३ रु. १५६००-३९१०० + ग्रेड पे रु. ७६००) वेतनश्रेणीत वेतन घेतील. त्यांच्या वार्षिक वेतनवाढी मंजूर करण्याबाबत डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती ही संस्था उचित कार्यवाही करील.

(३) **प्रतिनियुक्तीचा भत्ता :-** रितिका नरुला (भारतीय आर्थिक सेवा) यांना सदर प्रतिनियुक्तीच्या कालावधीत प्रतिनियुक्ती भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

(४) **वाहतूक भत्ता :-** केंद्र शासनाच्या नियमानुसार वाहतूक भत्ता अनुज्ञेय राहील. तथापि, डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती संस्थेने वाहन उपलब्ध करून दिल्यास वाहतूक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

(५) Children Education Allowance:- केंद्र शासनाच्या नियमानुसार श्रीमती रितिका नरुला (भा.आ.से.) यांना Children Education Allowance अनुज्ञेय राहील. तसेच सदर कालावधीत त्यांना जरी त्यांच्या अंतिम वेतन प्रमाणपत्रातही तसे नमूद केले असले तरी त्यांना विशेष वेतन अनुज्ञेय असणार नाही.

(६) **महागाई भत्ता :-** श्रीमती रितिका नरुला (भारतीय आर्थिक सेवा) यांना प्रतिनियुक्तीच्या कालावधीत भारतीय आर्थिक सेवा अधिकाऱ्यांना वेळोवेळी ज्या दराने महागाई भत्ता अनुज्ञेय असेल, त्या दराने महागाई भत्ता अनुज्ञेय असेल.

(७) **स्थानिक पुरक भत्ता :-** श्रीमती रितिका नरुला (भारतीय आर्थिक सेवा) यांना राज्य शासनाच्या नियमांनुसार/ आदेशानुसार वेळोवेळी अनुज्ञेय असेल त्या दराने स्थानिक पुरक भत्ता अनुज्ञेय असेल.

(८) **निवासस्थान किंवा त्याऐवजी घरभाडे भत्ता :-** श्रीमती रितिका नरुला (भारतीय आर्थिक सेवा) यांना प्रतिनियुक्तीच्या सदर कालावधीत त्यांच्या ताब्यात शासकीय निवासस्थान नसेल, तर त्यांना केंद्र शासनाच्या नियमानुसार वेळोवेळी अनुज्ञेय असलेला घरभाडे भत्ता अनुज्ञेय असेल.

(९) **प्रतिनियुक्तीच्या कालावधीत कर्तव्यार्थ केलेल्या प्रवासाकरीता प्रवासभत्ता :-** श्रीमती रितिका नरुला (भारतीय आर्थिक सेवा) यांना स्वीयेत्तर सेवेत रुजू झाल्यानंतर कर्तव्यार्थ कराव्या लागणाऱ्या प्रवासाकरीता केंद्र शासनाच्या नियमानुसार किंवा डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती संस्थेच्या नियमान्वये यापैकी ज्याचे नियम अधिक फायदेशीर असतील त्या नियमानुसार प्रवास भत्ता आणि दैनिक भत्ता घेण्याचा विकल्प देऊ शकतील.

(१०) **रजा :-** श्रीमती रितिका नरुला, (भारतीय आर्थिक सेवा) यांना प्रतिनिुयक्तीच्या कालावधीत केंद्रीय नागरी सेवा (रजा) नियम, १९७२ लागू असतील. प्रतिनियुक्तीच्या कालावधीत त्यांना सर्व प्रकारची रजा मंजूर करण्यास <u>विभागीय आयुक्त</u> सक्षम असतील. स्वीयेत्तर सेवेच्या कालावधीत अथवा अखेरीस घेतलेल्या रजेच्या कालावधीबद्दल द्यावयाच्या रजा वेतनाचा व

स्थानिक पूरक भत्यावरील संपूर्ण खर्च डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती संस्थेस सोसावा लागेल.

(११) **रजा वेतन व निवृत्ती वेतन अंशदाने** :- श्रीमती रितिका नरुला, (भारतीय आर्थिक सेवा) यांच्याबाबत रजा वेतन व अंशदान निवृत्ती वेतन हे विहीत असलेल्या दराने परिगणना करून संबंधित लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती ही संस्था करेल. प्रतिनियुक्तीच्या कालावधीतील या रकमांचा भरणा करण्यास विलंब झाल्यास डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती ही संस्था विलंब कालावधीतील अनुज्ञेय दंडात्मक व्याज भरण्यास जबाबदार राहील.

(१२) **नैमित्तीक रजा :-** श्रीमती रितिका नरुला, (भारतीय आर्थिक सेवा) यांना प्रतिनियुक्तीच्या कालावधीत राज्य शासनाच्या नियमानुसार नैमित्तीक रजा उपभोगता येईल. प्रतिनियुक्तीच्या कालावधीत नैमित्तीक रजा मंजूर करण्यास विभागीय आयुक्त, अमरावती सक्षम असतील.

(१३) **रजा प्रवास सवलत** :- श्रीमती रितिका नरुला, (भारतीय आर्थिक सेवा) यांना केंद्रीय नागरी सेवा (रजा) नियम, १९७२ मधील तरतूदीनुसार रजा प्रवास सवलत मिळविण्याचा हक्क असेल, याबाबतचा खर्च डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती ही संस्था करील. त्यांना प्रतिनियुक्तीच्या कालावधीत सर्व रजा मंजूर करण्यास विभागीय आयुक्त सक्षम असल्यामुळे अर्जित रजा कालावधीत रजा सवलत मंजूर करण्यास विभागीय आयुक्त, अमरावती सक्षम असतील.

(१४) **वैद्यकिय सवलती:-** श्रीमती रितिका नरुला, (भारतीय आर्थिक सेवा) यांना महाराष्ट्र राज्य (वैद्यकिय देखभाल) नियम १९६१ मधील तरतूदीनुसार वैद्यकिय सुविधांचा लाभ अनुज्ञेय असेल. त्यावरील खर्च डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती ही संस्था करील. मात्र, केंद्र शासनाच्या कर्मचाऱ्यांसाठी वैद्यकिय सवलती देण्याबाबत वेगळे नियम असतील आणि त्याचा लाभ श्रीमती रितिका नरुला (भारतीय आर्थिक सेवा), ह्या घेऊ इच्छित असतील तर प्रतिनियुक्ती कालावधीत त्या नियमाचा लाभ देण्याबाबत विकल्प देण्याचे स्वातंत्र्य त्यांना असेल.

(१५) **राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना** :- श्रीमती रितिका नरुला, भारतीय आर्थिक सेवा यांच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीत राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेतर्गत अशंदान निधीमधील वर्गणी चालू ठेवण्यात यावी.

(१६) **विभागीय चौकशी** :- श्रीमती रितिका नरुला, (भारतीय आर्थिक सेवा) यांच्याविरुध्द विभागीय चौकशीबाबत केंद्रीय नागरी सेवा (सीसीए) नियम, १९६५ लागू असतील, प्रतिनियुक्तीवर असताना त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी करावयाची असेल तर त्यांना केंद्र शासन सेवेत प्रत्यावर्तीत करण्यात येईल. यासंबंधी कारवाई अंतर्गत त्यांना

शासनाने निलंबित केल्यास निलंबनाच्या कालावधीत त्यांना डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती ही संस्था निर्वाह भत्ता देईल.

(१७) **गट विमा योजना :-** श्रीमती रितिका नरुला, (भारतीय आर्थिक सेवा) यांच्या वेतनातून दरमहा जी रक्कम आवश्यक आहे ती रक्कम केंद्र शासकिय कर्मचारी गट विमा योजनेच्या वर्गणीपोटी राज्य शासन दरमहा वसूल करील. सदर वर्गणी भरण्यास विलंब करण्यात आल्यास विलंब कालावधीत दंडनीय दराने व्याज आकारण्यात येईल. याबाबतची कार्यवाही डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती ही संस्था करेल.

(१८) **मोटार कार :-** श्रीमती रितिका नरुला (भारतीय आर्थिक सेवा) यांच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीत वापरासाठी त्यांच्या दर्जाप्रमाणे डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती यांच्यामार्फत वाहन उपलब्ध करून देण्यात येईल. सदर वाहनाचा खाजगी वापर पुढील अटींच्या अधिनतेने त्यांना करता येईल.

अ) वाहनाचा खाजगी वापर दरमहा २५० किलोमीटरहून अधिक होता कामा नये. यासाठी त्यांनी वेळोवेळी विहीत करण्यात येणाऱ्या दराने भाडे शासनास द्यावे लागेल.

ब) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-प्रवास-१०९०/प्र.क्र.३२०/९०/सेवा-५, दिनांक १७.१०.१९९० अन्वये निर्गमित केलेल्या आदेशानुसार वाहनाच्या खाजगी वापरास परवानगी असेल. मात्र संबंधित आदेशात वेळोवेळी ज्या सुधारणा केल्या जातील त्या सुधारणाही वाहनाच्या खाजगी वापराबाबत लागू असतील.

(१९) **प्रतिनियुक्तीवर असताना रजेवरून अथवा प्रशिक्षणावरून परत आल्यानंतर नियुक्ती :-** श्रीमती रितिका नरुला, (भारतीय आर्थिक सेवा) ह्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीत रजेवर गेल्या किंवा प्रशिक्षणासाठी गेल्या आणि त्या धारण करीत असलेल्या पदावर अन्य अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली अथवा रजेवर अथवा प्रशिक्षणावरून परत आल्यानंतर त्यांची नियुक्ती अन्य पदावर करण्यात आली तर, रजावेतन, वेतन, पदग्रहण अवधी, सक्तीचा प्रतिक्षा कालावधी इत्यादीबाबत सर्व खर्च, रजा समाप्तीच्या अथवा प्रशिक्षण समाप्तीच्या दिनांकापासून ते अन्य पदाचा कार्यभार धारण करेपर्यंतच्या दिनांकापर्यंत डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती ही संस्था सोसेल.

(२०) **निवासी शिपायाऐवजी रोख भत्ता :-** श्रीमती रितिका नरुला, (भारतीय आर्थिक सेवा) ह्या प्रतिनियुक्तीवर जाण्यापूर्वी त्यांना निवासी शिपायाऐवजी रोख भत्ता अनुज्ञेय असल्यास त्यांना प्रतिनियुक्तीच्या कालावधीत त्याच दराने निवासी रोख भत्ता अनुज्ञेय असेल, मात्र अशा भत्ता घेण्यापूर्वी दरमहा निवासी शिपाई देण्यात आलेला नाही असे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(२१) **प्रतिनियुक्तीच्या कालावधीत देशात/परदेशात प्रवास:-** डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेत प्रतिनियुक्तीवर असताना, विभागाच्या कामासंबंधात विभागीय आयुक्त यांचे सहमतीने देशात कोठेही प्रवास करावयाचा झाल्यास शासनाच्या पूर्वपरवानगीची आवश्यकता असणार नाही. मात्र, डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेच्या कामाच्या संबंधात परदेशी जावयाचे असल्यास, अथवा खाजगी कामांसाठी परदेशी जावयाचे असल्यास, शासनाची पूर्वपरवानगी आवश्यक असेल.

(२२) **शासनाने वेळोवेळी विहीत केलेले नियम लागू करणे:-** श्रीमती रितिका नरुला (भारतीय आर्थिक सेवा) यांना प्रतिनियुक्तीच्या कालावधीत राज्य शासन वेळोवेळी जे नियम करील किंवा जे कार्यकारी आदेश निर्गमित केले जातील ते नियम/कार्यकारी आदेश लागू असतील.

(२३) **विहीत अटी शर्तींमध्ये समाविष्ट नसलेल्या अटी/शर्तींबाबत:-** वर नमूद केलेल्या अटी/शर्तीमध्ये समाविष्ट नसलेल्या विशिष्ट अटी/शर्तींबाबत केंद्रीय नागरी सेवा संवर्गातील अधिकाऱ्यांना जे नियम, विनियम आणि कार्यकारी आदेश लागू असतील ते नियम, विनियम व कार्यकारी आदेश लागू असतील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८२३१२५८१८३७०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VILAS RAMDAS THAKUR

Digitally signed by VILAS RAMDAS THAKUR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=cb156fb408217396128e8dcaeed3f6fa70d9fd209eb9efc83bdd68b308614534, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=c8b1e52c5c4f922ab6eb7a0b44101c838aea34f29fbff0aebe9d85c3de3468c2, ou=GENERAL ADMINISTRATION DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VILAS RAMDAS THAKUR
Date: 2019.08.23 13:10:46 +05'30'

(वि. रा. ठाकूर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२) मा.प्रधान सचिव, मा.मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२.
३) महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे.
४) विभागीय आयुक्त, अमरावती.
५) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता-२)/(लेखा परीक्षा-२), नागपूर.
६) Deputy Director (IES Cadre) Department of Economics Affairs, Ministry Of Finance, Room No.५९, North Block, New Delhi.
७) निबंधक तथा सहायक प्राध्यापक, डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती.
८) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा-अमरावती

९) श्रीमती रितिका नरुला, संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती.

प्रत माहितीसाठी अग्रेषित:-

१) अपर मुख्य सचिव (सेवा) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

२) P.A. to Additional Chief Secretary, Dept. Of Economics Affairs, Ministry Of Finance, North Block, New Delhi, ११०००१

३) अवर सचिव/कक्ष अधिकारी (१०/९/९-अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

४) निवडनस्ती १२/अ.